म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय कादंबरी
दा. क्र. ४५३४

दिव्यमणि

BVBK-0404534

# दिव्यमणि



ना. ग्रं. सं. ठाणे
क्रय ना. वा.
क्र. ५०७८०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे.
तसे न केल्यास घटना नियम

# दिव्य मणि

( तीन सुरस कथा )

सविता अगरवाल,

बी. ए. (ऑ.)

BVBK-0404534

ानंद कार्यालय — पुणें २

५ ऑगस्ट १९५४ मूल्य ८ आणे

प्र का श क
गो. ब. जोशी
आ नं द का र्या ल य,
३३० सदाशिव, पुणें २

प्र थ मा वृ त्ति
१ ९ ५ ४

स र्व ह क्क
प्र का श का चे
स्वा धी न

मु द्र क
य. गो. जोशी
आ नं द मु द्र णा ल य
१९६/४६ स दा शि व
पु णें ..................२

अ नु क्र म :

१. दिव्य मणि ५
२. अखेर वसुंधरेनें पैज जिंकली २०
३. स्वरूपाराणीचें सौंदर्य ३२

माझा धाकटा भाऊ

चि. रविन्द्रकुमार

यास वाढदिवसानिमित्त

●

सविता अगरवाल

बी. ए. ( ऑनर्स )

# आशीर्वाद

अद्‌भुत गोष्टी कुणाला आवडत नाहींत ? मुलांना तर त्या आवडतातच पण मोठ्यांनासुद्धां त्यांची गोडी चाखण्यासाठीं मूल व्हावेंसें वाटतें. त्यांतून त्या गोष्टींत कल्पनेचा सुसंगत व रमणीय विलास असला म्हणजे तर त्यांचें आकर्षण जबरदस्त असतें. सविता अगरवाल हिच्या या चिमुकल्या संग्रहांतील तीनहि गोष्टी अशाच आकर्षक आहेत. अद्‌भुत सृष्टीचेहि कांहीं नियम असतात. मूळ पाया कल्पनेचा असला तरी वरील बांधकाम सुसूत्र, प्रमाणबद्ध, व भव्य असावें लागतें. हें सर्व असून नीतीचा जय दाखविलेला असला म्हणजे इमारतीवर सोन्याचा कळस चढविल्यासारखें होतें. मुलांचें निरागस मन अशा कथांमुळें हर्षितच नव्हे तर विकसितहि होतें. सविता अगरवाल हिच्या कथांत हे सर्व गुण आहेत. तिची भाषेची सुबोधता व विविध कल्पना चित्रांतली संगति वाखाणण्यासारखी आहे.

सविता अगरवाल हिला संवेदनाक्षम अंतःकरणाबरोबर श्रद्धा व हौस यांचीहि जोड लाभलेली आहे. तिची उद्योगशलिता वाखाणण्यासारखी आहे. वाङ्मयक्षेत्रांत या नवोदित लेखिकेला उज्ज्वल भवितव्य आहे अशी मला खात्री वाटते ती यामुळेंच. सविता आपल्या निसर्गसिद्ध गुणांचा साधनापूर्वक विकास करील आणि मराठी वाङ्मयाच्या बालवाङ्मयाचें उपेक्षित दालन आपल्या रम्याद्‌भुत कृतींनीं संपन्न करील याचा विसारच या चिमुकल्या संग्रहानें तिनें दिला आहे. तिच्या लेखनकौशल्याचें कौतुक प्रेमाशीर्वादपूर्वक करून तिची ही पहिली कृति शिशुवर्गापुढें मी ठेवीत आहें. आपल्या प्रतिभासंपन्न 'ताई'नें दिलेलें हें गोड 'साहित्य' मुलें मिटक्या मारीत सेवन करतील यांत शंका कशाला !

आनंद कार्यालय–पुणें
१५।८।५४ स्वातंत्र्यदिन

—गोपीनाथ तळवलकर

२०५८० वा.वा. १०५०१ २।२।६७

# . १ .

## दिव्य मणि


फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. श्रीपुर नगरावर वीरसिंह नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याला भद्रकाली नांवाची एक मुलगी होती. ती अतिशय दुष्ट होती. राजा-राणी हयात असेपर्यंत तिचा दुष्ट स्वभाव फारसा दिसून आला नाहीं. पण राजा मृत झाल्यावर एकुलती एक मुलगी असल्यामुळें भद्रकाली जेव्हां गादीवर बसली तेव्हां तिचा स्वभाव लोकांना कळला. आपण वैभवांत रहावें म्हणून तिनें तऱ्हेतऱ्हेचे कर लोकांवर लादले. व अमीर लोकांकडून सक्तीनें नजराणे घ्यावयास सुरवात केली. त्यामुळें श्रीमंत व गरीब सारे लोक हवालदील झाले. ती आपल्या नोकरांनाहि अतिशय कमी पगार देई. अशा तऱ्हेनें लोकांची पिळवणूक करून तिनें खूप धन जमविलें. तिचे मंत्रीहि तिच्या सारखेच दुष्ट होते. भद्रकालीला चांगला सल्ला देण्याऐवजी नेहमीं ती म्हणेल त्याला मान डोलावून ते तिच्या दुष्ट कृत्यांना उत्तेजनच देत; पण तिचा दिलीप नांवाचा एक मंत्री मात्र चांगला होता. तो नेहमीं राणीला चांगला सल्ला देई; पण भद्रकाली त्याचें ऐकत नसे व आपलें काम तसेंच चालू ठेवी. एकदां सहज बोलतां बोलतां

दिलीप म्हणाला कीं, ' राणी सरकार, तुम्हीं एवढें धन गोळा केलें. पण याचा उपयोग काय ? याचा उपभोग घेण्यास तुम्हीं अमर थोड्याच आहांत ? माणसाबरोबर धन कांहीं स्वर्ग वा नरकांत जात नाहीं. "

झालं ! राणीला त्या दिवसापासून अमर होण्याचा ध्यास लागला. त्यासाठीं तिनें अनेक देशांचे ग्रंथ मागविले व ते धुंडाळले. अखेर वंग देशाच्या ' मणिप्रताप ' नांवाच्या ग्रंथांत तिला हवी ती माहिती आढळली. त्या ग्रंथांत लिहिलेलें होतें कीं ' साता समुद्रापलीकडे आणखी एक आठवा समुद्र आहे. त्या समुद्रांत एक नाग राहतो. त्याच्या फणीवर असलेला मणि ज्यास मिळेल तो अमर होईल. ' त्या ग्रंथांत एवढीच माहिती दिलेली होती. आणि एवढ्याशा माहितीवर त्या मण्याचा शोध करणें फार कठिण होतें. तरी अमर होण्याच्या लालसेनें राणीनें शोध करावयाचें ठरविलें. अगोदर तिनें विचार केला कीं, आपल्या राज्यांतील कोणाला तरी तो मणि आणण्यासाठीं पाठवावें; पण मग तिला वाटलें कीं दुसरा कोणी गेला व त्याला खरोखरीच तो मणि सांपडला तर तो आपल्याला कांहीं मणि देणार नाहीं व स्वतःच अमर होईल. त्यापेक्षां आपणच जावें. असा विचार करून आपण कशासाठीं जात आहोंत, कोठें जात आहोंत हें कोणालाहि कळूं न देतां पन्नास स्वार बरोबर घेऊन राणी प्रवासाला निघाली. जातांना एक गोष्ट मात्र तिनें चांगली केली. ती म्हणजे दिलीपच्या हातांत राज्यकारभार दिला व त्याला सांगितलें

कीं ' मी आणखी तीन वर्षांत जर परत आलें नाहीं तर तूं निघ. मी सर्पमण्याच्या शोधार्थ जात आहे. '

राणी अगोदर वंगदेशांत गेली. व ' मणिप्रताप ' ग्रंथ लिहिणाऱ्याचा शोध तिनें केला; पण तो कांहीं भेटला नाहीं. अखेर त्या तुटपुंज्या माहितीवरूनच पुढें जाण्याचें तिनें ठरविलें. एक मोठी नौका तिनें खरेदी केली व वर्षभर पुरेल एवढें धनधान्य त्यावर भरलें. व आपल्या स्वारांसहित राणी



नौकेंत बसली. नौका चालू करणार तोंच आकाशांत उत्तरेकडून दक्षिणेकडे जाणारा धूमकेतु सर्वांना दिसला. हा

अपशकुन घडल्यामुळें राणीचे स्वार मनांत घाबरले व राणीला परत चलण्यासाठीं विनवूं लागले; पण गर्विष्ठ राणी म्हणाली, "त्यांत काय आहे? धूमकेतु कुठें तर आकाशांत नि आपण पृथ्वीवर! त्यानें आपल्याला कसला अपशकुन होतो? तें कांहीं नाहीं. आजच नि आतांच निघायचं. जहाज चालूं करा."

स्वार बिचारे काय करतात? हुकूम पाळायचा एवढंच त्यांचं काम होतं. त्यांनीं नाव चालू केली. सहा महिने प्रवास करून त्यांनीं तीन समुद्र ओलांडले. तोंपर्यंत कांहीं विघ्न आलें नाहीं. पण चौथ्या समुद्रांत प्रवेश केल्यावर मात्र संकटें येऊं लागलीं. जहाजांतील पाणी संपत आलें व वाट चुकून जहाज समुद्रांत भटकूं लागलें. कित्येक दिवस किनारा दिसला नाहीं. अखेर महिन्यानंतर दूर एक बेट दिसलें. लगेच जहाज तिकडे वळविण्यांत आलें. त्या बेटावर पाणी घेऊन निघायचें राणीनें ठरविलें. पण जहाज किनाऱ्याला लागण्यापूर्वींच त्यांनीं पाहिलें कीं किनाऱ्यावर कांहीं लोक उभे आहेत व त्यांच्या गळ्यांत कवट्याच्या माळा आहेत. तें नरभक्षक राक्षसांचें बेट होतें. तेव्हां तेथें उतरण्याचा बेत रद्द करावा लागला व जहाज तसेंच पुढें चालूं लागलें. आठ दिवस आणखी प्रवास केल्या-नंतर दूरवर त्यांना मोठें कारंजें उडतांना दिसलें. जहाजावरील कोणालाच कळेना कीं तें कारंजें कसलें आहे. आणि आश्चर्याची गोष्ट कीं तें कारंजें सरकत सरकत जहाजाच्या जवळ येत होतें. हा अद्भुत प्रकार पाहून सारे गोंधळून गेले व काय

अरिष्ट येतंय या भीतीनें स्तब्ध राहिले. अखेर तें कारंजें बरेंच जवळ आलें. तेव्हां साऱ्यांना कळलें कीं तो एक खूप मोठा मासा असून त्याच्या नाकांतून पाणी वर उडत होतें. त्या माशापासून जहाजाचा बचाव करण्याच्या प्रयत्नाला लागण्या-पूर्वींच त्या अजस्र माशानें जहाजाला टक्कर दिली. त्या धक्क्यानें जहाज उलटलें. आणि समुद्रांत ते सारे गडप झाले.

इकडे दिलीपच्या हातांत राज्यकारभार आल्यावर त्यानें प्रजेवरील करांचें ओझें कमी केलेंच, शिवाय ज्यांना ज्यांना विहीर खोदण्यासाठीं किंवा व्यापार करण्यासाठीं पैशाची गरज लागे त्यांना सरकारी खजिन्यांतून रक्कम उधार देण्याचें सुरू केलें. त्यामुळें व्यापार वाढला. पाणी मुबलक मिळूं लागल्या-मुळें अन्नाची पैदास भरपूर होऊं लागली. दिलीपनें न्याय-दानाच्या बाबतींतहि गरीब–श्रीमंत, लहान–थोर असा भेद-भाव न ठेवल्यामुळें सर्वांना सारखा न्याय मिळूं लागला व प्रजा सुखी होऊन दिलीपला दुवा देऊं लागली. अशा तऱ्हेनें तीन वर्षें निघून गेलीं. पण भद्रकाली परत न आल्यामुळें अखेर दिलीपनें तिच्या शोधार्थ जाण्याचें ठरविलें. आपल्या बरोबरीच्या इतर आमात्यांचा व आपल्या गुरुदेवाचा सल्ला त्यानें घेतला. राज्यांतील इतर साधु–संन्याशांना सर्पमण्याची माहिती विचारून घेतली व प्रजेचा निरोप घेतला. त्याला निरोप देतांना सर्वांनाच अतिशय वाईट वाटलें. वृद्धांनीं त्याला आशी-र्वाद दिला व स्वखुशीनें त्याच्याबरोबर जाण्यासाठीं कितीतरी युवक पुढें सरसावले. पण कोणालाहि बरोबर न घेतां दिलीप

निघाला. त्याच्या गुरूनें त्याला मंत्र टाकलेली रक्षा दिली व त्याला सांगितलें कीं प्रवासांत विश्रांतीच्या वेळीं नेहमीं हें भस्म कपाळावर लावीत जा. म्हणजे तूं असावध असतांना कोणी कांहीं करूं शकणार नाहीं.

दिलीप देखील अगोदर वंग देशांत गेला व स्वतः खूप हिंडून त्यानें मणिप्रताप लिहिणाऱ्या साधूचा शोध केला. गांवाबाहेरील एका पर्वताच्या गुहेंत तो साधू तप करीत बसला होता. दिलीपहि तेथेंच राहिला व साधूची समाधि उतरल्यावर त्याला देण्यासाठीं स्वच्छ पाणी व ताजी फळें



त्यानें आणून ठेवलीं. साधूने डोळे उघडल्यावर दिलीपने त्याला नमस्कार केला. व साधूनें विचारल्यावर आपला हेतु

सांगितला, व सर्पमण्याची माहिती विचारली. दिलीपच्या नम्रतेनें प्रसन्न होऊन साधू म्हणाला—' बेटा, तो मणि आठव्या समुद्रांत राहणाऱ्या एका कृष्णसर्पाच्या मस्तकावर आहे. त्या समुद्रावर जाण्यासाठीं जलमार्ग व भूमार्ग असे दोन मार्ग आहेत. तूं जलमार्गानें जाऊं नकोस. कारण त्या मार्गानें अनेक आपत्ति येतात. भूमार्गानेंच तूं जा. या मार्गानें जातांना रात्रीं तूं एखाद्या अरण्यांत विश्रांति घेतलीस व तुला कांहीं चमत्कार आढळला तर तें कृत्य यक्षांचें आहे असें तूं समज. आणि या यक्षांशीं मैत्री करण्याचा प्रयत्न कर. त्यानें तुझें भलें होईल. जा आतां. ईश्वर तुझें रक्षण करो. "

साधूला पुन्हां एकदां नमस्कार करून दिलीप गांवांत गेला. त्यानें एक शुभ्र रंगाचा सुंदर घोडा खरेदी केला व खाण्यापिण्याच्या आवश्यक वस्तु बरोबर घेऊन तो प्रवासाला निघाला. दुपारीं एका गावांत थांबून त्यानें भोजन उरकलें व थोडा वेळ विश्रांति घेतली. त्यानंतरचा त्याचा प्रवास अरण्यांतून सुरू झाला. रात्र होईपर्यंत आपण अरण्यांतून बाहेर पडूं असें त्याला वाटलें होतें. पण वाट चुकून तो अरण्यांतच भटकत राहिला. अखेर दमून त्यानें एका पिंपळाच्या विशाल वृक्षाखालीं झोंपण्याचें ठरविलें व गुरूनें दिलेलें भस्म कपाळाला लावून तो निश्चिंतपणें झोंपीं गेला. मध्यरात्रीं कसल्या तरी गडगडाटानें तो जागा झाला व डोळे उघडून पाहूं लागला. तेव्हां त्याला एक चमत्कार दिसला. एक मोठा थोरला महाल आकाशांतून जात होता व तो महाल इतका

चकाकत होता कीं त्यामुळें साऱ्या अरण्यांत दुपारचें ऊन पडल्यासारखें वाटत होतें. त्या उजेडांत त्यानें पाहिलें कीं कांहीं लोक भरजरी कपडे व हिऱ्यामोत्यांचे दागिने घालून इकडे तिकडे हिंडताहेत. हे लोक क्षणांत दिलीपला दिसत तर क्षणांत पुन्हा अदृश्य होत. इतक्यांत दिलीपच्या कानांत कुणीतरी त्याला विचारलें कीं ' तूं कोण आहेस ? व कोठें चालला आहेस ? ' प्रश्न विचारणारी व्यक्ति दिलीपला दिसत नव्हती. त्यामुळें तो खूप गोंधळून गेला व उत्तर द्यावें कीं न द्यावें याचा त्याला विचार पडला; पण मग त्याला त्या साधूचें बोलणें आठवलें. हे यक्ष लोक आहेत हें त्यानें ओळखलें व यांना खरें उत्तर देऊन यांच्याशीं मैत्री करावी या उद्देशानें त्यानें सारी माहिती सांगितली. त्यानंतर त्याला प्रश्न विचारणारी अदृश्य व्यक्ति त्याच्यासमोर उभी राहिली. तो यक्षांचा सरदार होता. त्याच्या मुगुटांत एक खूप तेजस्वी हिरा होता. व चंद्रकिरणांप्रमाणें त्यांचा प्रकाश चोहीकडे पसरला होता. यक्षसरदारानें दिलीपला विचारलें–' तुला तो मणि कशासाठीं हवाय ? '

" मला स्वतःला त्या मण्याची अभिलाषा नाहीं. मी कर्तव्य म्हणून राणीचा शोध करावयास निघालों आहे व तो मणि सांपडला तर राणीलाच द्यावयाचा माझा बेत आहे. "

" तुझी राणी मृत झाली आहे. तेव्हां आतां जर तो मणि सापडला तर तूं आम्हांला देशील कां ? त्याच्याबद्दल आम्हीं तुला दुसरें कांहींतरी अवश्य देऊं. "

" पण तुम्हीं त्या मण्याचें काय करणार आहांत ? "

" तें तुला नंतर कळेलच ! पण अगोदर तूं वचन दे म्हणजे मग आम्हीं तुला तो मणि कसा मिळेल तें सारें सांगतों. "

" पण तुम्हीं त्या मण्याचा दुरुपयोग केला तर ? "

" छे, छे ! आम्हीं शपथेवर सांगतों कीं त्याचा कोणत्याहि अनुचित कामासाठीं उपयोग करणार नाहीं. पण त्या मण्यामागील रहस्य इतक्यांतच तुला आम्हीं सांगूं शकत नाहीं. आम्हांला तो मणि कसा मिळवायचा तें माहीत आहे. पण कांहीं कारणामुळें आम्हीं तो मिळवूं शकत नाहीं. म्हणून तुला माहिती सांगून तो मिळवायचा आहे. "

" तर मग मी वचन देतों कीं मी तो मणि तुम्हांलाच देऊन टाकीन. "

दिलीपनें असें वचन दिल्यावर यक्षांचा सरदार त्याला आपल्या चमकणाऱ्या महालांत घेऊन गेला व नानातऱ्हेचीं फुलें फळें दिलीपला देऊन त्यानें त्याचा आदरसत्कार केला. पहांटेच्या सुमारास त्यानें दिलीपला एक अभ्रकाची शाल व एक छोटी तलवार दिली नि म्हटलें—" समुद्राकाठीं पोहोंचल्यावर तूं ही शाल आपल्याभोंवतीं नीट लपेटून घे. म्हणजे तूं पाण्यांत भिजणार नाहींस. तळाशीं पोहोंचल्यावर तुला पोवळ्यांचा महाल दिसेल, त्या महालाच्या दाराशीं तुला दोन राक्षस बसलेले दिसतील. तुला पहातांच ते तुझ्यावर धांवून येतील. त्यावेळीं न घाबरतां तूं म्हण ' यक्षाच्या राजासाठीं आलों आहे. ' त्याबरोबर ते पुन्हां आपापल्या जागीं जाऊन गुपचुप बसतील.

मग तूं सरळ आंत जा. अगदीं न भितां ज्या ठिकाणीं मणि



असलेला सर्प बसलेला असेल त्या ठिकाणीं जा. तुला पाहतांच तो सर्प देखील तुझ्यावर धांवून येईल. पण तो जवळ येण्यापूर्वीच तूं म्हण 'अद्‌भुत वनांतून धीरेन्द्राचा निरोप घेऊन आलों आहे' तूं असें म्हटल्यावर तोहि शांत होऊन बसेल. मग या तलवारीच्या सहाय्यानें तूं मणि काढून घे. मणि काढल्यानंतर मग तुला सारें रहस्य कळेल. पण तो मणि तूं परत दिला पाहिजेस हें लक्षांत ठेव. आणि मी सांगितलें त्याप्रमाणें सारें कर. तूं जर तो मणि आपल्याजवळ ठेवण्याचा

प्रयत्न केलास तर मात्र याद राखून ठेव. माझ्याशीं गांठ आहे. जा आतां."

"पण त्या समुद्रापर्यंत मी कसा पोहोंचणार?"

"अरे हो! विसरलोंच कीं. तुला त्या समुद्राकाठीं पोहोंचविण्याची व्यवस्था मी करतों. आतां पहाट झालीच आहे. लगेच तुला पोहोंचवितों. हं! डोळे मिट. मी सांगेन तेव्हांच उघड. अगोदर उघडलेस तर प्राणाला मुकशील."

दिलीपनें डोळे मिटले त्याबरोबर आपण आकाशांतून उडत चाललों आहोंत असा त्याला भास झाला. डोळे उघडून पाहण्याची अनिवार इच्छा त्याला झाली, पण यक्ष-सरदारानें डोळे उघडल्यास प्राणाला मुकशील असें सांगितलेलें असल्यामुळें त्याला डोळे उघडण्याचा धीर झाला नाहीं. थोडया वेळानें यक्ष-सरदार म्हणाला "हं—आतां उघड डोळे."

दिलीपनें डोळे उघडून पाहिलें तेव्हां यक्षांच्या सरदाराबरोबर आपण समुद्राकाठीं उभे असल्याचें त्याला आढळलें. यक्ष-सरदार म्हणाला, "हा आठवा समुद्र. आतां तूं उडी मार. मी परत जातों." दिलीपनें त्याला नमस्कार केला व अभ्रकाची ती शाल अंगाभोंवतीं नीट लपेटून घेऊन समुद्रांत उडी मारली. ती शाल असल्यामुळें समुद्रांतील प्राण्यांनीं त्याला त्रास दिला नाहीं, व तो पोवळ्यांच्या महालाजवळ आला. त्यानंतर यक्षांच्या सरदारानें सांगितल्याप्रमाणें सारें कांहीं त्यानें केलें व सर्पाच्या मस्तकावरील मणि तलवारीनें काढला. तो मणि काढल्याबरोबर त्याच्या समोर भरजरी वस्त्रें परिधान

केलेला एक धिप्पाड मनुष्य उभा राहिला. त्याच्या मस्तकावर एक मुकुट होता व त्यांत असंख्य हिरे, पाचू, माणिक बसविलेले होते. पण मुकुटाच्या मध्यभागीं दिलीपनें काढलेल्या मण्याएवढी जागा रिकामी होती. दिलीप चकित होऊन त्या माणसाकडे पहातच राहिला. अखेर तो मनुष्यच गंभीर आवाजांत म्हणाला, " बाळ, आतां तुला काय हवंय् ? "

" म–मला कांहीं नको. पण तुम्हीं कोण आहांत ? " दिलीपनें विचारलें.

तो मनुष्य हंसून म्हणाला, " तुला त्या यक्षांनीं कांहीं सांगितलं नाहीं वाटतं ? पण एकंदरींत सांगितलं नाहीं तें बरंच झालं म्हणा. असो. ऐक, मी त्या यक्षांचा राजा भूषणसिंह आहे. हा मणि मला इंद्रानें बक्षीस दिला होता. एकदां वनदेवी आमच्या वनांत आल्या. त्यांच्या राणीनें हा मणि पाहिला व तिला तो हवासा वाटला. तिनें तो मजजवळ मागितला. पण मला मिळालेलें हें बक्षीस तिला द्यावयास मी तयार झालों नाहीं. तेव्हां संतापून तिनें शाप दिला कीं ' तूं कृष्णसर्प होऊन समुद्रांत राहशील. एकहि यक्ष या वनाबाहेर पडून तुला भेटूं शकणार नाहीं व या मण्याचा तुला कांहीं उपयोग होणार नाहीं.' शाप परत घेण्यासाठीं मी तिला खूप विनविलें. पण माझें कांहीं एक न ऐकतां ती निघून गेली. तेव्हां मी इंद्राकडे गेलों व त्याला सारी हकिगत सांगितली. त्यानें वनदेवींच्या त्या राणीला बोलाविलें. व ' दुसऱ्याची वस्तु जबरदस्तीनें मिळविण्याचा तुला काय हक्क आहे, कां तूं शाप दिलास ? '

इत्यादि बोलून त्यानें तिची खूप कानउघाडणी केली व शाप मागें घेण्यास सांगितलें. इंद्राच्या आज्ञेचें उल्लंघन करण्याइतकें धैर्य वनदेवीजवळ नव्हतें; पण शाप परत न घेतां तिनें एवढाच उःशाप दिला कीं ' यक्षांना जरी त्या समुद्रांत जातां आलें नाहीं तरी एखाद्या माणसाला मात्र जातां येईल. व ज्यावेळीं एखादा मनुष्य समुद्रांत जाऊन तुझ्या मस्तकावरील मणि काढून घेईल त्यावेळीं तुला पुन्हां पूर्वरूप प्राप्त होईल.' एवढें म्हणून मनांतल्या मनांत जळफळत वनदेवी निघून गेली व मी या समुद्रांत पडलों. माझे सरदार चांगल्या माणसाच्या शोधांतच होते. त्यांना अखेर तूं सापडलास व आज मी शापमुक्त झालों आहे."

आतां दिलीपच्या लक्षांत आलें कीं तो मणि परत देण्याचा आग्रह यक्षाच्या सरदारानें कां धरला. तो म्हणाला, " हा घ्या तुमचा मणि. तुमची वस्तु लुबाडून मी अमर होऊं इच्छित नाहीं."

त्याची निस्पृह वृत्ति पाहून यक्षराज खूष झाला. व म्हणाला– " बेटा, याचा चांगला मोबदला मी तुला देईन." नंतर तो मणि घेऊन त्यानें आपल्या मुकुटांत बसवून टाकला. व दिलीपचा हात धरून तो समुद्राबाहेर आला. नंतर त्यानेंहि दिलीपला डोळे मिटण्यास सांगितलें. व दिलीपनें डोळे मिटल्यावर त्याला तो आपल्या बनांत घेऊन आला. दिलीपनें जेव्हां डोळे उघडले तेव्हां रंगीबेरंगी फुलांनीं सारें बन शृंगारलेलें त्याला दिसलें. अनेक वाद्यें वाजत होतीं.

व एक सोन्याचा रथ त्याच्यासमोर उभा होता. यक्षराजानें आपल्याबरोबर दिलीपला रथांत घेतलें. व तो राजवाड्यांत आला. तेथें आल्यावर त्यानें दिलीपला हिरे, माणकांनीं भरलेली एक थैली दिली व म्हटलें–" ही थैली नेहमीं भरलेलीच



राहील. नि त्यामुळें तुला कधींहि पैशाची कमतरता भासणार नाहीं. आता येथून तूं जाशील तेव्हा श्रीपुरचे लोक तुलाच राज्याभिषेक करतील नि ह्या राज्यावर तुझ्या वंशांतील अनेक पिढ्या राज्य करतील."

दोन दिवस यक्षराजाचा पाहुणचार घेऊन दिलीप परत श्रीपुरला आला. तो येण्याची बातमी अगोदरच लोकांना

कळली होती. व त्यांनीं मोठ्या उत्साहानें गुढ्या तोरणें उभारून सारें नगर शृंगारलें होतें. दिलीप आल्यावर त्याला ते दरबारांतच घेऊन गेले व त्याला त्यांनीं राज्याभिषेक करून टाकला नि दिलीपला सर्पमणि जरी मिळाला नाहीं तरी वंशपरंपरेनें चालणारें श्रीपूरचें राज्य त्याला मिळालें व लोकांच्या सुखांत आपलें सुख पाहत तो राज्य चालवूं लागला. अखेरीस आपल्या सत्कृतीनें तो अमर झाला. अजूनहि तुम्हीं कधीं श्रीपूरला गेलात तर तेथील लोक मोठ्या भक्तिभावानें दिलीपचें नांव घेत असल्याचें तुम्हाला आढळेल.

# .२.

# अखेर वसुंधरेनें पैज जिंकली !

वैशालीची राजकन्या वसुंधरा व विराटनगरचा राजपुत्र शूरसेन या दोघांची बरीच मैत्री होती. लहानपणापासून दोघेहि एकत्र खेळलीं होतीं व बरोबरच शिकलीं होतीं; पण शूरसेन हा भारी घमेंडखोर होता. तो नेहमीं वसुंधरेला म्हणे,—" मुली त्या मुलीच ! त्यांना कधींच मुलां-सारखीं धाडसाचीं कामें करतां येणार नाहींत. " यावर मग वसुं-धरेचा व शूरसेनाचा खूप वाद-विवाद होत असे. राजपुत्र आपलेंच म्हणणें खरें म्हणत असे, नि ती सालस राजकुमारी उगीच शब्दानें शब्द वाढायला नको म्हणून गप्प बसे; पण मनांतून मात्र तिनें शूर-सेनाची खोड मोडण्याचें ठरविलें होतें आणि तशी संधि तिला लव-करच मिळालीहि !



वैशाली आणि विराटनगर यांच्यामध्यें एक खूप मोठें घनदाट अरण्य होतें. आतांपर्यंत लोक त्यांतून ये जा करीत असत; पण दोन महिन्यांपासून त्या अरण्यांत एक राक्षस येऊन राहिला होता. त्यामुळें कोणीहि त्या अरण्यांत शिरलें कीं हुडहुडी भरून त्याला खूप ताप येत असे व अर्ध्या वाटेंतूनच तो कण्हत कुंथत घरीं परत येई. अनेक लोक अशा तऱ्हेनें आजारी पडले. कुणाचीच त्या अरण्यांतून जाण्याची छाती होईना, नि जे कोणी धाडसीपणानें आंत गेले ते परत आलेच नाहींत. त्यामुळें वैशाली व विराटनगरचा संबंध अगदीं तुटल्या-सारखा झाला. या राज्यांतील लोकांना तिकडे जातां येईना नि तिकडच्या लोकांना इकडे येतां येईना. तेव्हां वसुंधरा शूर-सेनाला म्हणाली, "मुलें धाडसीं असतात ना! मग तुझा पराक्रम दाखव आतां."

"हो, हो. दाखवतोंच; पण जिंकलों तर काय देशील?"

"तूं मागशील तें देईन."

"बघ हं लक्षांत ठेव."

"हो. पण तूं पैज हरलास नि त्यानंतर मी जिंकली तर काय देशील?"

"तूं म्हणशील तें देईन."

"मी हरलों. 'मुलीदेखील शूर असतात' असं तूं मला लिहून द्यायचं. आहे कबूल?"

"हो!"

त्यानंतर एका उमद्या घोड्यावर बसून राजपुत्र निघाला. नगरापासून अरण्य कांहीं खूप दूर नव्हतें. संध्याकाळपर्यंत राजपुत्र त्या अरण्याशीं पोहोंचला, नि लगेच विश्रांति न घेतां अरण्यांत शिरला; पण जसजसा तो आंत जाऊं लागला तसतशी त्याला थंडी वाजूं लागली. त्यानें आपले उबदार कपडे घातले; पण छे ! थंडी वाजण्याचें मुळींच कमी होईना. आपल्याला खूप ताप येणार असें त्याला वाटूं लागलें. तेव्हां कुठें तरी विश्रांति घ्यावी या विचारानें तो जवळपास एखादी झोंपडी दिसते कां हें पाहूं लागला. दूर अंतरावर त्याला अंधुक प्रकाश



दिसला. तेव्हां तेथें आपल्याला रात्रभर राहतां येईल असें वाटून राजपुत्र त्या अनुरोधानें निघाला. झोपडीच्या दाराशीं पोहोंचल्यावर राजपुत्रानें ओरडून विचारलें, "आंत कुणी आहे कां ?"

आवाज ऐकून एक जख्ख म्हातारी बाहेर आली. कांपऱ्या आवाजांत तिनें विचारलें, "कोण आहेस तूं ? काय हवंय् तुला ?"

"मी विराटनगरचा राजपुत्र आहें नि मला रात्रभर येथें रहायचं आहे." घमेंडखोर राजपुत्रानें उत्तर दिलें. त्याचा तो

ताठरपणा त्या म्हातारीला आवडला नाहीं. तिच्या कपाळावर आठ्या चढल्या; पण राजपुत्राचें तिकडे लक्ष गेलें नाहीं. म्हातारीला गप्प बसलेली पाहून तो चढ्या सुरांत म्हणाला, " ऐकूं आलं कां ग म्हातारे ? "

त्याचे हे उर्मटपणाचे शब्द ऐकून म्हातारीला अनावर संताप आला नि जळजळीत दृष्टीनें तिनें राजपुत्राकडे पाहिलें. त्याबरोबर राजपुत्राचें डोकें गरगरूं लागलें. आपल्या भोंव-तालच्या साऱ्या वस्तु फिरत आहेत असें त्याला वाटूं लागलें नि बेशुद्ध होऊन तो धाड्दिशीं खालीं कोसळला.

सकाळीं सूर्यकिरणांनीं जेव्हां तो जागा झाला तेव्हां एका मोठ्या महालाच्या दाराशीं आपण पडलों आहोंत असें त्याला आढळलें. तो झटकन् उठून बसला व इकडे तिकडे पाहूं लागला. त्याबरोबर त्या महालाचा दरवाजा उघडला व दगडाची एक मूर्ति सरकत सरकत त्याच्याजवळ आली व तिनें त्याचा हात धरला. हा चमत्कार पाहून राजपुत्र गोंधळून गेला व त्या मूर्तीकडे पहातच राहिला. त्या मूर्तीनें त्याचा हात धरला व ती राजपुत्राला आंत घेऊन गेली. आंत तशाच अनेक मूर्ति कामें करीत होत्या. राजपुत्र चकित होऊन पहात होता. त्याला घेऊन ती मूर्ति दरबारासारख्या दिसणाऱ्या एका मोठ्या श्रृंगारलेल्या दिवाणखान्यांत आली. तेथें एका सोन्याच्या सिंहासनावर एक अतिशय लावण्यवती स्त्री बसलेली होती. राजपुत्राला पाहून ती थोडीशी हंसली, मग त्याला उद्देशून म्हणाली, " माझें नांव सुन्दरी. ये आपण फांसे खेळूं या. "

हिला नाहीं म्हटलें तर ती आपल्याला भेकड, नादान समजेल म्हणून तिच्याशीं खेळून तिला हरवावं असा विचार करून राजपुत्रानें होकार दिला. तेव्हां एका मूर्तीनें खेळाची



सुंदरी म्हणाली, 'ये, आपण फासे खेळूं.'

सारी तयारी केली. मग सुन्दरी व शूरसेन दोघेंहि खेळायला बसली. पहिला डाव राजपुत्रानें जिंकला. दुसरा डावहि त्यानेंच जिंकला पण मग मात्र तो हरूं लागला. आपल्या अंगावरील

दागदागिने त्यानें पणाला लावले. घोडा लावला. भरजरी कपडेहि लावले. अखेर स्वतःला पणाला लावलें नि तो हरला. तेव्हां ती स्त्री विकटपणें हंसली व स्वतःशींच म्हणाली,"आतां माझ्याजवळ नव्याण्णव लोक झाले. दोन महिन्यांनीं बाबा आले म्हणजे त्याना किती आनंद होईल. मग एकेकाचा बळी काली देवीला दिल्यावर ती नक्कीच प्रसन्न होईल नि मग.... मजाच मजा! आतां फक्त एक माणूस हवाय्. मिळेल, दोन महिन्यांत तोहि मिळेल...."

तिचें तें भयंकर बोलणें ऐकून शूरसेनाच्या जिवाचा थरकांप झाला. तेवढ्यांत त्या स्त्रीनें त्याच्यावर पाणी शिंपडलें व ती कांहीं तरी पुटपुटली. त्याबरोबर राजपुत्राचें एका दगडाच्या मूर्तींत रूपांतर झालें व सुन्दरीनें आज्ञा दिल्यावर ती मूर्ति सरकत सरकत बागेंत माळ्याचें काम करावयास निघून गेली.

महिना होऊन गेला तरी शूरसेन परत आला नाहीं, तेव्हां वडिलांची परवानगी घेऊन स्वतः वसुन्धरा त्याच्या शोधार्थ निघाली. राजकुमारीचे भरजरी वस्त्रालंकार तिनें काढून ठेवले व साध्या गरीब मुलीचे कपडे घालून ती निघाली. शूरसेनाप्रमाणेंच तीहि म्हातारीच्या झोंपडीशीं पोहोंचली व "आंत कोणी आहे कां?" असें तिनेंहि विचारलें; पण राजपुत्राप्रमाणें उर्मटपणें कांहीं विचारलें नाहीं, तर अगदीं मृदु आवाजांत तिनें विचारलें. तिचा आवाज ऐकून ती म्हातारी बाहेर आली. वसुंधरेनें तिला अगदीं वांकून नमस्कार केला नि

म्हातारी कांहीं बोलण्यापूर्वींच तिनें विचारलें " आजीबाई, मला आजची रात्र जर तुमच्याकडे राहूं दिलं तर फार कृपा होईल. " तिच्या नम्रपणानें ती म्हातारी खूष झाली; पण तिनें



'आजीबाई, आजची रात्र येथें राहूं कां ?'...

तसें दाखविलें नाहीं नि वसुंधरेला ती म्हणाली, " हें बघ मुली, तूं रहा इथें; पण माझं थोडं काम अगोदर करावं लागेल. " " हो करीन कीं ! " वसुंधरा चटकन् म्हणाली. " मग असं कर, माझ्या गाईम्हशींना चारा घालावयाचा राहिला आहे तो

अगोदर घाल. नंतर स्वैंपाक कर आणि ही झोंपडी व अंगण झाडून बरेच दिवस होऊन गेले आहेत, त्यामुळें बरीच घाण सगळीकडे झाली आहे. तर तूं सर्वत्र झाडून स्वच्छता कर व अंथरूणं घाल. करशील ना हें सारं ?"

राजकुमारीनें हीं कामें कधींच केलीं नव्हतीं; पण तिला तीं कशीं करावयाचीं हें माहीत होतं. शिवाय स्वभावानेंहि ती अतिशय सज्जन होती. त्यामुळें त्या म्हातारीला 'नाहीं' म्हणणें तिच्या जिवावर आलें व तिनें चटकन् होकार दिला. लगेच ती कामालाहि लागली. म्हातारी अंगणांतल्या पारावर बसून तिचें काम पहात होती.

वसुंधरा थंडी वाजत होती म्हणून झोंपडींत आली होती; पण कामाला सुरुवात केल्यावर तिला मुळींच थंडी वाजेनाशी झाली. तिनें सारीं कामें अगदीं व्यवस्थित केलीं व म्हातारी-जवळ ती येऊन बसली. तेव्हां खूष होऊन ती म्हातारी म्हणाली, "चार महिन्यांपासून मी इथें रहातेय्; पण तुझ्यासारखं सुस्वभावी मला कुणीच आढळलं नव्हतं. अनेक लोक येथून गेले; पण कुणीच मला मदत केली नव्हती. तूं कोण आहेस, कुठें चालली आहेस हें सारें मला माहीत आहे. तेव्हां मी सांगतें तें नीट ऐक व त्याप्रमाणें कर.

"उद्यां सकाळीं मी देईन तें पाणी पिऊन तूं प्रवासाला नीघ. दुपारपर्यंत उत्तरेकडे चालल्यानंतर तुला एक मोठा महाल दिसेल. तूं जवळ गेल्याबरोबर त्याचा दरवाजा उघडेल व एक दगडाची मूर्ति तुझा हात धरून एका खोलींत घेऊन जाईल.

तेथील सिंहासनावर एक स्त्री बसलेली असेल. ती तुला फांसे खेळायला बोलावेल पण तूं खेळूं नकोस. त्यामुळें त्या स्त्रीनें रागावून कितीहि आरडाओरडा केला तरी तूं मुळींच घाबरूं नकोस. ती तुला कांहींहि करूं शकणार नाहीं. कारण, जोंपर्यंत तूं फांशांच्या खेळांत हरली नाहींस तोंपर्यंत ती कांहीं करूं शकत नाहीं. लगेच तूं त्या स्त्रीच्या उजव्या हाताकडे असलेल्या खोलींत जा. तेथें सात रंगांचे सात भाले तुला आढळतील. ते घेऊन तूं त्याच खोलीला असलेल्या सात दरवाज्यांत क्रमानें जा व एकेका भाल्यानें एकेका प्राण्याला ठार कर. एवढें केल्यावर मग मी तुला भेटेन व पुढें काय करायचें तें सांगेन."

दुसऱ्या दिवशीं म्हातारीनें दिलेलें पाणी पिऊन वसुंधरा निघाली व तिनें सांगितल्याप्रमाणें सारें केलें. त्या स्त्रीनें तिला फांसे खेळायला बोलाविलें पण वसुंधरेनें नकार दिला. तेव्हां ती स्त्री अतिशय चिडली व आपलें सुंदर रूप टाकून तिनें भयंकर रूप घेतलें. ती एक राक्षसीण होती. तिचें तें अक्राळविक्राळ स्वरूप पाहून वसुंधरा भेदरलीच; पण म्हातारीचें बोलणें आठवून तिला धीर आला व ती लगेच खोलींत शिरली. तेथें इंद्रधनुष्याच्या रंगांचे सात भाले होते. त्यांतला पहिला तांबड्या रंगाचा भाला घेऊन तिनें सावधपणें पहिला दरवाजा उघडला. त्याबरोबर एक लाल रंगाचें भयंकर रानमांजर तिच्यावर धावून आलें. वसुंधरा सावध होतीच. तिनें तो भाला त्या मांजराच्या छातींत खुपसला तसें तें मरून

पडलें. अशाच तऱ्हेनें दुसऱ्या खोलींत लांडगा, तिसऱ्यांत अस्वल, चौथ्यांत गेंडा, पांचव्यांत वाघ, सहाव्यांत अजगर व सातव्यांत सिंह तिच्यावर धावून आले. आपण नेहमीं



तिचें तें अक्राळविक्राळ स्वरूप पाहून वसुंधरा भेदरलीच....

पाहतों त्यापेक्षां या प्राण्यांचे रंग कितीतरी निरनिराळे होते. लांडग्याचा रंग नारिंगी होता, तर अस्वलाचा पिवळा; गेंडा गर्द हिरव्या रंगाचा होता, तर वाघ निळा होता; अजगर

पांढराशुभ्र होता नि सिंहाचा रंग जांभळा होता. ते भाले या प्राण्यांच्या रंगासारखेच होते व त्या प्राण्याच्या रंगासारखा जो भाला असेल त्यानेंच तो प्राणी मारला जात होता. वसुंधरेनें सातवा दरवाजा उघडून जेव्हां सिंहाला ठार केलें तेव्हां मोठा गडगडाट होऊं लागला, व प्रत्येक वस्तूंतून, भिंतींतून, जमिनींतून मोठमोठ्या ज्वाळा निघूं लागल्या. वसुंधरा तें पाहून अतिशय घाबरली. कारण या प्रसंगांतून कशी सुटका करून घ्यावयाची तें त्या म्हातारीनें सांगितलेलें नव्हतें. अखेर ती बेशुद्ध पडली.

वसुंधरा जेव्हां शुद्धीवर आली तेव्हां, आपण एका झोंपडींत पडलों आहोंत असें तिला आढळलें. तिच्या शेजारींच ती म्हातारी बसलेली होती. याखेरीज आणखीन् एक मुलगीहि जवळच बसलेली होती. वसुंधरेनें विचारलें "मी इथें कशी आलें? ही मुलगी कोण आहे?" तेव्हां ती म्हातारी म्हणाली, "बाळ, ही माझी मुलगी आहे. एकदां हिच्या हातून कांहीं चूक झाली तेव्हां चेटकिणीनें हिचें त्या दुष्ट स्त्रींत रूपांतर केलें आणि सांगितलें कीं, एखादी दयाळू अंतःकरणाची मुलगी आली व तिनें प्रयत्न केला तरच मंत्रप्रभाव नष्ट होईल. चार महिन्यांपासून मी इथें वाट पहात होतें पण दयाळू अंतःकरणाचें कुणीच आलें नव्हतें. अखेर तूं आलीस व आमचा उद्धार झाला. आतां आणखी थोडेंसें काम कर. ह्या भांड्यांतील पाणी घेऊन त्या मूर्तींवर शिंपड म्हणजे त्या सजीव होतील."

राजकन्या लगेच उठली व बाहेर अंगणांत असलेल्या प्रत्येक मूर्तीवर तिनें पाणी शिंपडलें. राजकुमार शूरसेनाहि सजीव झाला. वसुंधरेला पाहून त्यानें खालीं मान घातली. तें पाहून वसुंधरा गालांतल्या गालांत हंसली. त्यानंतर राजकन्येनें त्या सर्व लोकांना आपापल्या घरीं जावयास सांगितलें व शूरसेनाकडे वळून ती म्हणाली, " स्त्रियादेखील धाडसी असतात हें पटलें ना ? "

" हो " खालीं मान घालून राजपुत्रानें उत्तर दिलें. त्यानंतर त्या म्हातारीचा निरोप घेऊन दोघेहि वैशाली नगरींत परत आलीं. वसुंधरेनें राजपुत्राची नाचक्की होऊं नये म्हणून खरी हकिगत कोणालाच सांगितली नाहीं. आणि आईवडिलांना ती म्हणाली कीं, " राक्षसाच्या हातून सर्वांची सुटका करून हे परत येतच होते. मी तर तेथपर्यंत गेलेंहि नाहीं. निम्म्या वाटेंतूनच यांच्याबरोबर परत आलें. " वसुंधरेच्या मनाचा मोठेपणा पाहून राजपुत्र मनांतल्या मनांत अगदीं शरमून गेला व खरी हकिगत सांगणार तोंच वसुंधरेनें डोळ्यानेंच त्याला ' कांहीं सांगूं नका ' असें दटावलें. थोड्याच दिवसांत वसुंधरा व शूरसेन यांचा विवाह मोठ्या थाटामाटांत झाला.

आतां शूरसेन चुकूनहि असें म्हणत नाहीं कीं, " मुली त्या मुलीच ! त्यांना कांहीं मुलांसारखीं धाडसाचीं कामें करतां येणार नाहींत. "

## ३.

# स्वरूपाराणीचें सौंदर्य

मद्रदेशची राजकन्या स्वरूपाराणी आपल्या नांवाप्रमाणेंच अतिशय सुंदर होती. प्रत्येकजण तिच्या सौंदर्याची वाखाणणी करीत असे. त्यामुळें ती खूप गर्विष्ठ झाली होती. कुणालाहि टाकून बोलायची नि मोठ्या माणसांचाहि अपमान करायची. पण ती राजाची लाडकी लेक होती, त्यामुळें राजाकडे तक्रार करण्याचें धैर्य कोणास होत नसे व मूग गिळून सारे गप्प बसत.



स्वरूपाराणी सोळा वर्षांची झाली तेव्हां राजा श्रीवर्मा व राजगुरु नन्दिदत्त या दोघांनीं पूर्ण विचार करून गंधिल देशचा राजकुमार गुणदत्त याच्याशीं तिचें लग्न करण्याचें ठरविलें व राजकन्येची संमति घेण्यासाठीं तिला बोलाविलें. राजकन्या मोठ्या तोऱ्यांतच राजगुरु व राजा बसले होते तेथें आली. तिनें राजगुरूंना पाहिलें पण त्यांना नमस्कार न करतांच एकदम राजाकडे वळून म्हटलें, “ काय आहे बाबा ? कशाला

मला बोलाविलें ? ” “ अगोदर राजगुरूंना नमस्कार कर नि येथें बैस, मग सांगतों ” श्रीवर्मा प्रेमळपणें म्हणाले.

नापसंतीचा आविर्भाव करून राजकन्येनें कसाबसा नमस्कार केला व राजानें दाखविलेल्या जागेवर ती बसली. राजगुरु सारें कांहीं पाहत होते पण त्यांनीं आपला राग आवरला. शांतपणें ते म्हणाले, “ हें बघ बाळ, आम्हीं तुझा विवाह गंधिल देशच्या गुणदत्ताशीं करण्याचें ठरविलें आहे. नावा-प्रमाणेंच तो फार गुणी आहे. राज्यांतील लोक त्याचें नांव मोठ्या भक्तिभावानें घेतात नि इतर राजे त्याला वचकून असतात. त्याच्या पराक्रमाची ख्याति दूरदूरच्या देशांत पसरली आहे. त्यामुळें कुणाचीहि त्याच्या राज्याकडे वांकड्या नजरेनें पाहण्याची छाती होत नाहीं. तेव्हां सर्व गोष्टी विचारांत घेऊन तूं संमति द्यावीस. ही बघ त्याची तसबीर. ”

राजगुरूंनीं दाखविलेल्या तसबिरीकडे राजकन्येनें पाहिलें मात्र, लगेच उसळून ती म्हणाली—“ असल्या कुरूप माण-साशीं माझें लग्न ठरवितांना तुमचें डोकें ताळ्यावर होतें ना ?—”

“ स्वरूपा, काय बोलतेस हें ? पाय धर अगोदर राजगुरूंचे ” श्रीवर्मा ओरडून म्हणाले.

राजगुरु तर क्रोधानें थरथर कांपत होते. त्यांच्या डोळ्यां-तून जणूं ठिणग्या बाहेर पडत होत्या. आजवर त्यांचा असा अपमान कुणीहि केलेला नव्हता. आपला राग त्यांना आवरतां आला नाहीं. ते राजकन्येला म्हणाले, “ उद्धट पोरी, ज्या सौंदर्याच्या घमेंडींत तूं माझा अपमान केलास, तेंच नष्ट होऊन

जाईल—" नि लगेच ते तेथून निघून गेले. श्रीवर्मा हतबुद्ध होऊन पाहतच राहिले. भानावर आल्यानंतर ते स्वरूपाराणीला म्हणाले—" काय केलंस हें मुली ? जा, आतां तरी धांवत जाऊन त्यांची क्षमा माग—"



पण स्वरूपाराणीला राजगुरूंचा शाप खरा होईल असं वाटेना. अजूनहि तिच्या डोळ्यावर चढलेली सौंदर्याभिमानाची धुंदी उतरलेली नव्हती. तुच्छतेनें 'हं–' असा उद्गार काढून ती आपल्या महालांत निघून गेली.

पण राजगुरूंचा शाप खरा होणार होता ! हळूं हळूं स्वरूपाचें सौंदर्य नष्ट होऊं लागलें. जाईच्या फुलासारखा असलेला तिचा गौरवर्ण काळसर होऊं लागला, रेशमासारखे मऊ असलेले केस राठ नि कुरळे झाले, कमळासारखे मोठे असलेले डोळे बटबटीत वाटूं लागले, ओठ मोठे झाले व कुंदकळ्यांसारखे असलेले दांत ओठाबाहेर डोकावूं लागले. कुरूपपणाचीं जीं कांहीं लक्षणें असतात तीं सर्व तिच्यांत दिसूं लागलीं. पूर्वीं लोक तिच्या सौंदर्याची वाखाणणी करीत असत. आतां तिला पाहिल्यावर ते फिदीफिदी हंसूं लागले. राजवाड्याबाहेर पडण्याचीहि बिचाऱ्या स्वरूपाला लाज वाटूं लागली.

आपलें नाहींसें झालेलें सौंदर्य परत मिळावें म्हणून राजकन्या खूप प्रयत्न करी. तऱ्हेतऱ्हेचीं उटणीं व औषधें तिनें शरिराला लावलीं, पण तिचा काळा रंग कमी झाला नाहीं. राजगुरूंकडे जाऊन तिनें त्यांची क्षमाहि मागितली. पण राजगुरूंचा राग अजून शांत झालेला नव्हता, आपला अपमान ते विसरले नव्हते. त्यांनीं कांहीं उःशाप दिला नाहीं.

आतां मात्र राजकन्येला पश्चात्ताप होऊं लागला. आपण तसें उद्धटपणें बोलायला नको होतें, आपलें चुकलें असें तिला आतां सारखें वाटूं लागलें. पश्चात्तापानें तिचें हृदय होरपळत होतें. पण त्याचा काय उपयोग होता ? गुणदत्ताशीं ठरलेलें लग्न केव्हांच मोडलें होतें. त्याचें दुसऱ्याच एका सुंदर राजकन्येशीं लग्न झालें होतें. स्वरूपाच्या मैत्रिणीदेखील आतां तिच्यापासून दूर दूर राहूं लागल्या होत्या. बिचारी स्वरूपा

एकटी आपल्या खोलींत उदासपणें विचार करीत बसे. या परिस्थितींतून कसा मार्ग काढावा हें तिच्या लक्षांत येईना.

एकदां अशीच खिन्नपणें आपल्या खोलींत विचार करीत बसली असतांना सहज ती स्वतःशींच म्हणाली–“ हें हिडीस रूप घालवून जो कोणी मला माझें सौंदर्य परत मिळवून देईल त्याच्याशीं मी मोठ्या आनंदानें लग्न करीन ! ”

“ खरं कां ? ” कुणीतरी विचारलं. राजकन्येनें दचकून आजूबाजूला पाहिलं. पण कोणीच दिसेना.

“ आतां म्हणालीस तें खरं का ? ” पुन्हां तोच आवाज आला. राजकन्या खूप घाबरली. पण धीर करून म्हणाली—

“ हो खरं. पण तुम्हीं कोण आहांत ? ”

“ तें मग सांगेन. अगोदर वचन दे कीं ‘माझें सौंदर्य मला परत मिळाल्यावर मी तुझ्याशीं लग्न करीन.’ म्हणजे मग मी सारें कांहीं सांगेन. ” ती अदृश्य व्यक्ति पुन्हां म्हंणाली.

“ मी वचन देतें. पण तुम्हीं मला दिसत कां नाहीं ? ”

“ मला पाहिल्यावर तूं आपला बेत बदलणार नाहींस ना ?”

“ मुळींच नाहीं. पण तुम्हीं कसे आहांत तें मला पाहूं द्या. ” राजकन्येनें असें म्हटल्यावर भुतासारखा दिसणारा एक मनुष्य तिच्यासमोर उभा राहिला. त्याच्या शरिरावरील व डोक्यावरील केस ताठ उभे होते. त्याचे डोळे खोल गेलेले होते. नाक मोठें नि पोपटासारखें होतें. शिवाय त्याला घाणेरडी दाढी होती. तें ध्यान पाहून राजकन्या भीतीनें

थरथर कापूं लागली. तिनें आपले डोळे घट्ट मिटून घेतले नि ती बेशुद्ध होऊन खालीं कोसळली.



थोड्या वेळानें ती शुद्धीवर आली नि तिनें डोळे उघडले, तेव्हां तो मनुष्य तिच्याजवळ बसून तिला प्रेमळपणें म्हणत होता—" स्वरूपा, ऊठ ना. मला पाहून इतकी भीति वाटत असेल तर मीं पुन्हां अदृश्य होतों. " नि खरोखरीच तो पुन्हां दिसेनासा झाला. आतां राजकन्येची भीति कमी झाली होती. आपण याला वचन दिलंय याची तिला आठवण झाली नि ती म्हणाली—" आतां नाहीं मला भीति वाटणार. तुम्ही अदृश्य नका राहूं. "

लगेच तो मनुष्य पुन्हा दिसूं लागला. त्यानें हळूंच स्वरूपाचा हात धरला व म्हटलें, " चल आतां माझ्याबरोबर ! सुंदर कसं व्हायचं तें मीं दाखवितों. पण एक अट आहे कीं मी सांगेपर्यंत आरशांत पहायचं नाहीं. आहे कबूल ? "

" हो. "

" चल तर मग. पण कुणी पाहूं नये म्हणून आपण दोघंहि अदृश्य होऊन बाहेर पडूं या. " असं म्हणून त्यानें तिच्यावर व स्वतःवर कसली तरी पूड टाकली. त्याबरोबर दोघेहि दिसेनासे झाले. मग एकमेकांचा हात धरून तीं राजवाड्याबाहेर पडलीं.

बाहेर आल्यावर त्या माणसानें बागेंत लपवून ठेवलेले दोन कंबरपट्टे आणले. त्या कंबरपट्ट्यांना अभ्रकाचे पंख लावलेले होते. त्या माणसानें एक स्वतःच्या कमरेला बांधला व दुसरा स्वरूपाला दिला. स्वरूपानंहि पट्टा कमरेला बांधल्यावर तो म्हणाला, " माझं नांव केशी. आतां आपण तुला कोणी ओळखणार नाहीं अशा ठिकाणीं जाऊं या. तेथें मग आपण लोकांना दिसलों तरी त्यांना कांहीं वाटणार नाहीं. व तुलाहि आपल्या कुरूपपणाची लाज वाटणार नाहीं. "

" हो, अशाच ठिकाणीं आपण अगोदर जाऊं या. "

" चल तर मग. पण मी सांगेन तसं तुला करावं लागेल हं ! तूं ऐकणार नसलीस तर आतांच परत जा. "

" ऐकेन मी ! पण खरंच मी पूर्वीसारखी होईन ना ? "

" हो. "

" मग चला. " केशीनें मग राजकन्येचा हात धरला व तो एकदम वर उडाला.

आतां दोघेहि आकाशांतून प्रवास करूं लागलीं. बराच वेळ प्रवास केल्यावर राजकन्या म्हणाली, " मी दमलें आतां ! किती दूर आहे तुमचं घर ? "

" आतां येईलच. तेथें गेल्यावर मग भरपूर विश्रांति घे. "

थोड्या वेळानें केशी हळूंहळूं खालीं उतरला. खालीं आल्यावर त्यानें दोघांचेहि कंबरपट्टे काढून टाकले व दूरच्या एका झोंपडीकडे बोट दाखवून तो म्हणाला " तें आहे माझं घर ! "

" तें ? तिथं का रहायचं ? " राजकन्येचा गर्व संपूर्णपणें नाहींसा झालेला नव्हता. तिला पश्चात्ताप झालेला होता तरी ती फारच सुशील अन् सद्गुणी झालेली नव्हती. त्यामुळें त्या झोंपडींत रहायचें हें ऐकल्यावर तिला कसेंसेंच वाटलें. तिला वाटलें होतें कीं, केशी एखाद्या माणसाकडे घेऊन जाईल व औषध द्यायला लावील. नि तें घेतल्यावर आपण लगेच सुंदर होऊं. पण आतां तर केशी म्हणत होता कीं तेथें त्या झोंपडींत रहावें लागेल. तिला विचार करतांना पाहून केशी म्हणाला—
" कां ? कसला विचार चाललाय ? परत घरीं जायचं आहे कां ? "

राजकन्येला एकदां वाटलं कीं, हो म्हणून सांगावं नि परत घरीं जावं; पण आपण त्याला वचन दिलंय आणि वचनभंग केल्यास आणखीन कांहीं संकट आलं तर ? खेरीज मग आपल्याला कोण सुंदर करणार ? असा विचार करून राजकन्या

म्हणाली, “ छे, छे ! सुंदर झाल्याखेरीज मी घरीं जाणार नाहीं. चला तुमच्या घरीं. ”

तीं दोघेंहि झोंपडींत आलीं. आंत खूप धूळ साचलेली होती, भिंतींवर कोळिष्टकें होतीं नि सामानसुमान फारसें नव्हतेंच ! केशीनें केरसुणी घेतली व तो झोंपडी झाडूं लागला. त्याला काम करतांना पाहून राजकन्येला स्वस्थ बसून राहण्याची लाज वाटूं लागली व ती म्हणाली, “ मी झाडतें घर ! तुम्ही आपल्यासाठीं खायचें कांहीं घेऊन या. ”

‘ बरं ’ असं म्हणून केशी बाहेर निघून गेला. तो गेल्यावर राजकन्या स्वस्थ बसून राहिली. ‘ मी झाडतें ’ असं ती केशीला म्हणाली खरी; पण मग तें काम करायचा तिला संकोच वाटूं लागला. उगीच आपण तसं बोललों असं तिला वाटलें नि कांहीं काम न करतां ती स्वस्थपणें बसून राहिली. थोड्या वेळानें केशी कांहीं फळें घेऊन परत आला तेव्हां झोपडी झाडलेली नव्हती. राजकन्या खोटें बोलली हें पाहून त्याला खूप राग आला व तो ओरडून म्हणाला, “ अशानं तूं मुळींच सुंदर होणार नाहींस. इथं खरं बोलावं लागेल. नि सारीं कामं करावीं लागतील. तुझ्यानें हें होणार नसल्यास चालती हो. ”

राजकन्येचा असा अपमान आजपर्यंत कुणीहि केलेला नव्हता. पण घरीं कसं जायचं ? रस्ता कुठें माहीत आहे ? बिचारी राजकन्या मुकाट्यानें उठली, केरसुणी घेऊन तिनं घर झाडून स्वच्छ केलं. तेव्हां केशी म्हणाला, “ हं ! असं काम केल्यावरच सुंदर व्हायला मिळेल. हीं फळें घे. हवीं तेवढीं खा.

इथें आणखी कांहीं खायचं मिळणार नाहीं. उद्यां मी लांकडं तोडून आणीन. तीं विकून जे पैसे येतील त्यानें एक गाय आपण खरेदी करूं. म्हणजे मग आपलं काम व्यवस्थित चालेल." राजकन्या कांहींच बोलली नाहीं. दोन-तीन फळें तिनें खाल्लीं व तिथलीच एक चटई अंथरून त्यावर झोंपी गेली.

दुसऱ्या दिवशीं अगदीं पहांटेच केशीनें तिला उठविलें. राजकन्येला इतक्या लवकर उठण्याची मुळींच संवय नव्हती. त्यामुळें ती चिडली. तेव्हां केशी म्हणाला, "असं चिडायचं नसतं. नि माझ्याकडे पहांटेच उठून कामाला लागावं लागतं. तुला सुंदर व्हायचं आहे ना? मग मी सांगेन तसं तूं केलं पाहिजेस." डोळे चोळीत राजकन्या उठली व कामाला लागली. केशी लांकडे तोडायला निघून गेला. तो निघून गेल्यावर थोड्याच वेळानें एक म्हातारी झोंपडीजवळ आली व राजकन्येला म्हणाली–"बाळ, मी खूप दमलें आहे. थोडावेळ तुझ्या झोंपडींत विश्रांति घेऊं कां? बरं वाटूं लागल्यावर मी जाईन माझ्या घरीं."

त्या म्हातारीची मान सारखी हलत होती, डोळ्यांतून पाणी गळत होतें. कंबर वाकलेली होती नि काठीचा आधार घेऊन बिचारी चालत होती. स्वरूपाला कांहीं तिला घरांत घेण्याची इच्छा होईना; पण केशीला हें कळलें नि तो रागावला तर? म्हणून तिनें म्हातारीला आंत येण्यास सांगितलें. म्हातारी लटपटत आंत आली व चटईवर झोंपली. थोड्या वेळानें केशी परत आला. म्हातारी झोंपलेलीच होती. त्यानें सहज तिच्या

अंगाला हात लावून पाहिला तों त्याच्या हाताला चटकाच बसला. म्हातारीला खूप ताप आला होता ! लगेच केशी धावत



धावत पुन्हां अरण्यांत गेला व कसलासा पाला घेऊन आला. त्याचा रस काढायला त्यानें राजकन्येला सांगितलें. राजकन्येनें तो रस काढून आणल्यावर त्यानें तो म्हातारीला पाजला. पण म्हातारीला बरं वाटलं नाहीं.

आणि दोन महिने ती म्हातारी आजारीच होती. या वेळांत केशीनें तिची खूप शुश्रूषा केली. नि त्याच्या सांगण्यावरून राजकन्यादेखील तिची शुश्रूषा करीत असे. सुरुवातीला राज-

कन्येला त्याची कटकट वाटे. पण हळूंहळूं तिला संवय झाली व सारें काम ती अगदीं मन लावून करूं लागली. केशीनें सांगण्यापूर्वींच ती सारें कांहीं व्यवस्थितपणें करून ठेवी. आतां तिचा स्वभाव खरोखरीच बदलला होता. तिचा गर्विष्ठपणा पूर्णपणें नाहींसा झाला होता.

अखेर म्हातारी खडखडीत बरी झाली. केशीला व राजकन्येला अगदीं हायसं वाटलं. आपण एका व्यक्तीचे प्राण वांचविले या विचारानें दोघांनाहि अगदीं खूप समाधान वाटलें. ज्यादिवशीं म्हातारी हिंडूं फिरूं लागली त्यादिवशीं रात्रीं दोघांनाहि या समाधानामुळें अगदीं गाढ नि शांत झोंप लागली. पण मध्यरात्रीं कसला तरी मोठा गडगडाट होऊं लागला. राजकन्येनें भीतीनें अगदीं गच्च डोळे मिटून घेतले. थोड्या वेळानें तो गडगडाट बंद झाला तेव्हां तिनें डोळे उघडून पाहिलें. नि काय आश्चर्य ! ती एका मोठ्या, वैभवसंपन्न राजवाड्यांतील मंचकावर पहुडलेली होती. नि दुसऱ्या एका मंचकावर केशी झोंपलेला होता. तोहि जागा झाला. नि त्यांच्या समोर त्यांना एक तेजस्वी स्त्री उभी असलेली दिसली. तिनें तारकांचे दागिने घातलेले होते नि रुपेरी वस्त्रें परिधान केलेलीं होतीं. स्वरूपा व केशी आश्चर्यानें स्तंभित होऊन तिच्याकडे पाहतच राहिले. त्यांना चकित झालेले पाहून ती स्त्री गोड आवाजांत म्हणाली—"मला तुम्हीं ओळखलं नाहीं ना ? मी वनदेवी आहे. केशी, तुझ्या आईनें एकदां मी संकटांत सांपडलें असतांना मला मदत केली होती. म्हणूनच तुला मदत करण्यासाठीं मी म्हाता-

रीचें रूप घेऊन आलें होतें. तुमचा दोघांचाहि स्वभाव आतां चांगला झाला आहे म्हणूनच मी आतां तुम्हांला पुन्हां सुंदर करतें. तुम्हीं लग्न करा नि सुखी व्हा. पण दुष्टपणानें वागलात तर मात्र तुमचें सौंदर्य नष्ट होईल हं ! ” एवढं बोलून वन-



देवीनं दोघांच्याहि मस्तकावर हात ठेवले व लगेच ती अदृश्य झाली. स्वरूपा आतां पूर्वीसारखीच सुंदर दिसूं लागली होती नि केशीच्या ऐवजीं एक सुंदर राजपुत्र तिच्यासमोर उभा होता. तो म्हणाला,—“ माझें खरें नांव जयवर्मा. पूर्वीं मी अति-

28.5.60

शय दुष्ट होतों. गादीवर आल्यानंतर मी खूप अत्याचार केले, त्यामुळें प्रजा त्रासून गेली होती. एकदां असाच मी नगरांतून मिरवत जात असतांना मला एक म्हातारी दिसली. ती चेटकीण होती; पण मला काय ठाऊक ? मी तिच्यावर ओरडलों, ' म्हातारडे, रस्त्याच्या मध्यें कां उभी राहिलीस ? बाजूला थांबलीस तर काय बिघडेल ? ' ती चेटकीण रागावली व ओरडली,—' ज्या राज्याचा तुला इतका गर्व आहे तेंच नष्ट होऊन जाईल व तूं एकटा भुतासारखा राहशील. ' असा शाप देऊन ती निघून गेली नि राज्याच्या जागीं एक घनदाट अरण्य निर्माण झालें. महालाचें झोंपडींत रूपांतर झालें व मी देखील भुतासारखा दिसूं लागलों. सारे जण मजजवळ यायला भीत असत. अखेर तुझ्याकडून वचन घेऊन मी तुला येथें आणलें. मला खात्री होती कीं सत्कर्म केल्यानें मला माझें राज्य परत मिळेल व तुला तुझें हरपलेलें सौंदर्य मिळेल. आतां काय बेत आहे तुझा ? "

" मी तुम्हांला दिलेलं वचन माझ्या लक्षांत आहे. " लाजत राजकन्या म्हणाली.

" खरंच तूं करशील माझ्याशीं लग्न ? " आनंदित होऊन जयवर्म्यानें विचारलें.

" हो. पण अगोदर मला बाबांकडे पोहोंचती करा. त्यांना मी सारी हकिगत सांगितल्यावर ते आपला विवाह करून देतील. "

" बरं, तुझ्या जाण्याची व्यवस्था करतों." असें म्हणून जयवर्मा तेथून बाहेर गेला, व त्यानें तिच्या जाण्याची व्यवस्था केली.

इकडे श्रीवर्मा काळजी करीतच होता. त्यानें राजकन्येचा खूप शोध करविला होता. पण ती जेव्हां सांपडली नाहीं तेव्हां कुरूपपणामुळें त्रासून तिनें आपल्या जिवाचें कांहीं बरेंवाईट करून घेतलें असें त्याला वाटलें. तरी पण तो शोध करीतच होता. नन्दिदत्ताचा रागहि आतां शांत झाला होता आणि एके दिवशीं अचानक स्वरूपाराणी त्यांच्यासमोर हजर झाली. तिला तिच्या पूर्वीच्या स्वरूपांत पाहून त्यांना भारी आश्चर्य वाटलें नि आनंदहि झाला. राजकन्येनें यावेळीं नम्रपणानें दोघांनाहि अगदीं वांकून नमस्कार केला व सारी हकिगत सांगून म्हटलें,–" बाबा, आतां यापुढें काय करावयाचें तें तुम्ही ठरवा. मी तुमच्या आज्ञेबाहेर नाहीं." राजकन्येला असं शालीनतेनं वागतांना पाहून श्रीवर्मा व नन्दिदत्त या दोघांनाहि समाधान वाटलें. अंतरींच्या सौंदर्याचें महत्त्व बाह्य सौंदर्याहून अधिक आहे हें राजकन्येला उमगलें हें पाहून त्यांना बरें वाटलें. स्वरूपाचें वचन पूर्ण व्हावें म्हणून जयवर्म्याशींच तिचें लग्न करण्याचें त्यांनीं ठरविलें व लगेच जयवर्माकडे पुढचीं बोलणीं करण्याकरितां दूत पाठविले.

त्यानंतर पहिल्याच मुहूर्तावर जयवर्मा व स्वरूपाराणी यांचा मोठ्या थाटामाटांत विवाह झाला, व दोघेहि सुखानें

राज्य करूं लागले. प्रजेच्या सुखांत ते आपले सुख मानूं लागले. त्यामुळें लोक संतुष्ट झाले. तेथील लोक आपापल्या मुलांना उपदेश करतांना अजूनहि म्हणतात कीं ' जयवर्मा व स्वरूपाराणी यांच्यासारखं अंतर्बाह्य सुंदर झालं पाहिजे. '



मनोरंजक
व सचित्र
मुलामुलींचें
मासिक

# आनंद

नव नवीन
स्वरूपांत
रोज पहा
**वा. व. ४ रु.**

BVBK-0404534

## सोन्याचा बाण

—ना. ध. पाटील

# आमचीं प्रकाशनें

| पुस्तक | किंमत आणे | पुस्तक | किंमत आणे |
|---|---|---|---|
| बालरामायण | ६ | बालविनोदमाला भाग २ ते ४ प्र. | २ |
| बालभारत | १० | बालविहारमाला ,, ,, | २ |
| महाभारतांतील सोप्या गोष्टी | १२ | एका दिवसाच्या सुटींत | ४ |
| रामायणांतल्या सोप्या गोष्टी | १२ | मनी आणि मोत्या | ४ |
| बालभागवत | १२ | कां व कसें ? ( नवी आवृत्ति ) | १२ |
| साधुसंतांच्या गोष्टी | १२ | नाट्यरामायण व नाट्यभारत प्र. | ८ |
| बालमनोरंजन | ५ | मुक्तधारा | ८ |
| चित्तरंजन अथवा मुलांचें अरेबियन नाइट्स् भाग १ ला | १२ | दोन चुटके ८१॥ विद्यामंदिरांत | २ |
| | | गांधी–गीता | ५ |
| लिंबोणीच्या झाडाखालीं | १२ | अरविंदबाबूंचीं पत्नीस पत्रें | ३ |
| परिस्तानांतल्या गोष्टी | १२ | शिशुविहार ( कवितासंग्रह ) | ३ |
| | | टापटिपीचा संसार–नवी आवृत्ति | रु. १॥ |
| मुलांचें शहाणपण | १२ | लेखनकला | रु. २ |
| स्वर्गावर स्वारी | १२ | थोर विभूति | रु. १। |
| सात राजहंस | ८ | आकाशमंदिर ( कादंबरी ) | रु. २ |
| चंदाराणी | ८ | अशोकचरित्र | रु. १॥ |
| रुपेरी मनोरा | ६ | रवींचे उज्ज्वल किरण | रु. १ |
| चंद्रशेखर व मोहना | ६ | मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी | रु. २ |
| कुमार मित्रांनो | रु. १। | मराठी–बंगाली शिक्षक | रु. २ |
| विज्ञानकथा भाग १ | रु. १। | बंगाली–मराठी शब्दकोश | रु. ४ |
| विज्ञानकथा भाग २ | रु. १।≈ | संस्कृत–मराठी कोश | रु. १॥ |
| विज्ञानकथा भाग ३ | रु. १॥≈ | मराठी शब्दरत्नाकर | रु. १२ |

## आनंदकार्यालय, ३३० सदाशिव, पुणें.

प्रकाशक : गो. ब. जोशी, आनंदकार्यालय, ३३० सदाशिव पेठ, पुणें २

मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १९६।४६ सदाशिव पेठ, पुणें २